# ‘विश्वकर्मा’मध्ये ‘इको-कॅम्पस’

पुणे : विश्वकर्मा खासगी विद्यापीठात ‘इको-कॅम्पस’ उपक्रमाचे नुकतेच उद्घाटन करण्यात आले. त्यामुळे आता विद्यापीठाचा आवार येत्या दोन वर्षांत पर्यावरणपूरक होणार आहे. याप्रसंगी इंटिग्रेटेड इंजिनिअरिंग सोल्यूशन्सचे (आयईएस) संस्थापक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. डॉन मॅक्लिन उपस्थित होते. विश्वकर्मा विद्यापीठाने सिंगापूर येथील एनटीयू संस्थेसमवेत हा उपक्रम सुरू केला आहे. संस्थेच्या इको-कॅम्पस प्रकल्पाचे संचालक डॉ. नीलेश जाधव, आयईएसचे आशिया आणि मध्य-पूर्व भागाचे संचालक रोहन रावते, विद्यापीठाचे अध्यक्ष भरत अगरवाल, कुलगुरू डॉ. सिद्धार्थ जबडे, उपाध्यक्ष डॉ. वासुदेव गाडे या वेळी उपस्थित होते. या उपक्रमांतर्गत तंत्रज्ञानाचा वापर करून विनाकारण सुरू असलेले दिवे, पंखे, संगणक बंद करण्याची यंत्रणा विकसित करण्यात येणार आहे. कागदाचा वापर कमी करण्यासाठी डिजिटल माध्यमाचा प्रभावी वापर केला जाणार आहे, अशी माहिती इको-कॅम्पस उपक्रमाचे डॉ. कैलास पाटील यांनी दिली.